
Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
English Part - II /
Marathi / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

English Part - II / Marathi / Hindi

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal**

**Journal No. 40776**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्य चळवळीचे महत्व<br>**डॉ. प्रा. जयश्री देशमुख** | १-३ |
| २ | वि. का. राजवाडेंचे इतिहास लेखनशास्त्र<br>**श्री. विलास आत्माराम देऊलकर** | ४-७ |
| ३ | मराठवाड्याच्या ग्रामीण साहित्यातील स्त्रीदर्शन<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ८-१० |
| ४ | एकविसाव्या शतकातील स्त्री<br>**श्रीमती शेख जहारा अब्दुल रहिम** | ११-१३ |
| ५ | ग्रामीण कथेतील स्त्री चित्रणाची : विविधता<br>**डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहीणार** | १४-१६ |
| ६ | शेतीमधील मानवी चिंता आणि समस्या<br>**डॉ. फोले संभाजी कोंडबाजी** | १७-२१ |
| ७ | २०१० नंतरच्या मराठी स्त्रीवादी कवितेतील आत्मभान (निवडक कवियत्रीच्या संदर्भात)<br>**योगिता चोडणकर** | २२-२८ |
| ८ | स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. रंजना पाटील** | २९-३३ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्य चळवळीचे महत्व<br>**डॉ. प्रा. जयश्री देशमुख** | १-३ |
| २ | वि. का. राजवाडेंचे इतिहास लेखनशास्त्र<br>**श्री. विलास आत्माराम देऊलकर** | ४-७ |
| ३ | मराठवाड्याच्या ग्रामीण साहित्यातील स्त्रीदर्शन<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ८-१० |
| ४ | एकविसाव्या शतकातील स्त्री<br>**श्रीमती शेख जहारा अब्दुल रहिम** | ११-१३ |
| ५ | ग्रामीण कथेतील स्त्री चित्रणाची : विविधता<br>**डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहीणार** | १४-१६ |
| ६ | शेतीमधील मानवी चिंता आणि समस्या<br>**डॉ. फोले संभाजी कोंडबाजी** | १७-२१ |
| ७ | २०१० नंतरच्या मराठी स्त्रीवादी कवितेतील आत्मभान (निवडक कवियत्रीच्या संदर्भात)<br>**योगिता चोडणकर** | २२-२८ |
| ८ | स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. रंजना पाटील** | २९-३३ |

# ७. २०१० नंतरच्या मराठी स्त्रीवादी कवितेतील आत्मभान (निवडक कवियत्रीच्या संदर्भात)

**योगिता चोडणकर**
सहायक प्राध्यापक, विद्या प्रबोधिनी वाणिज्य, शिक्षण, संगणक, व्यवस्थापन महाविद्यालय, पर्वरी गोवा.

**प्रस्तावना**

प्रस्तूत शोधनिबंधात 2010 नंतरच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या आत्मभानाचा शोध घेतलेला आहे.हे आत्मभान बालिका ज्ञानदेव, सारिका उबाळे परळकर, शर्मिष्ठा भोसले आणि योजना यादव यांच्या कवितेंचा आधारे शोधलेला आहे.

'आत्मभान' या शब्दातून स्त्रियांना स्वतःविषयीचे आलेले भान अपेक्षित आहे. कवितेच्या माध्यमातून हे आत्मभान प्रखरपणे व्यक्त होते. स्त्रियांचे होणारे शोषण, नाकारले जाण्याची भावना, दुय्यमत्वाचे स्थान, त्यांचे होणारे बाजारीकरण यांची जाणीव आत्मभानातून होऊ लागली. या सर्वातून मुक्त होण्यासाठी विद्रोह करणे आवश्यक आहे हे ही त्यांना कळले.2010 नतंरच्या कवितेतून ही आत्मभानाची जाणीव त्यांनी समर्थपणे व्यक्त केलेली आहे.

2010 हा कालखंडाचा विचार करण्यापाठीमागे विशेष हेतू आहे. 2010 हा कालखंड जागतिकीकरणाच्या प्रभावाचे परिणामात रूपांतर झालेले होते. त्याची झळ कष्टकरी, मजूर, श्रमिक यांच्याबरोबर स्त्रियांना देखील बसलेली आहे. त्यांचा शोध घेणे अपेक्षित आहे.

**आत्मभानाची जाणीव**

2010 नतंरच्या स्त्रीवादी कवितेचा विचार केला असता जाणवते की स्त्री आपला षोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. या समाजव्यवस्थेत स्त्रीचे होत असलेले बाजारीकरण, नाकारल्याची भावना, षोषण याची जााणीव स्त्रियांना होऊ लागली. व्यवस्थेची रचना अषा प्रकारची आहे जिथे स्त्रीचे क्षणोक्षणी षोषण होते. या सगळयांचा षोध ती आत्मभानातून घेते. त्याचबरोबर त्याच्या मुळाषी जाण्याचा प्रयत्नही ती आपल्या कवितेतून करते. या आत्मभानामुळे ती व्यवस्थेला विरोध करते, तीव्रपणे नकार देते. 2010 नतंर इतर जाणिवांबरोबर आत्मभान ही जाणीव कवितेत अधिक प्रखरपणे व्यक्त होते.त्यामुळे आपण ही जाणीव अधिक सखोलपणे जाणून घेतलेली आहे.

आपण स्त्री असल्यामुळे आपल्यावर अन्याय होतो, आपल्याला नाकारलं जाते ही जाणीव त्यांना होते. 2010 नंतरच्या कवितेचा करता हे आत्मभान पुढील आषयसूत्रांच्याआधारे नोंदविता येईल.

**१. स्त्री असण्याचे भान**

स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचा मूलस्त्रोत तिचे स्त्रीत्व आहे. स्त्री म्हणून जगत असताना प्रथा, परंपरा, संस्कृतीच्या नावाखाली आपण चिणले जातो. या यज्ञात आपण समीधा होतो याची जाणीव तिला तीव्रतेने होते आणि त्याविरूध्द ती लढते.

"तू संस्कृतीच्या यज्ञात समिधा झालीस
अन उत्क्रातीच्या चितेवर सती गेलीस
प्रगतीच्या बुरूजाखाली चिणले गेलेत
तुझ्या बाईपणाचे सांगाडे "

(बयाsBy Sharmishtha Bhosale, Monday, January 19,2015. ½

स्त्रीच जीवन षर्मिष्ठा भोसले संस्कृतीचा यज्ञ,समिधा, बुरूज, बाईपणाचे सांगाडे, आदि प्रतिमांतून विषद करतात.या षोषणाचा परिणामामुळे स्त्रीचं जीवन पूर्णपणे संपून जाते. खर तर त्यांना पापण्या मिटून जगायला षिकवल जातंयाबाबत सारिका उबाळे परळकर म्हणतात–

"तू षापित अप्सरा जणू स्वर्गाची
झोळी फाटलेल्या दारिद्राच्या
अंगणात रूजलेली"

(पृ.क 30, सोनी मनीच्या दोन कविता, शिरःस्ताना)

स्त्रीच्या अस्त्विाचा षोध 'षापित अप्सरा' या प्रतिकातून सारिका उबाळे परळकर घेतात. या व्यवस्थेने आपल्याला षापित ठरविले आहे याची जाणीव त्यांना आहे. पण परिस्थितीसमोर हतबल आहे. ती स्वतः संपून जाते. नदीची प्रतिमा वापरून बालिका ज्ञानदेव ही जाणीव नेमकेपणाने व्यक्त करतात.

"आणि मी बसते खारी होऊन तुझा आकार वाढवतीत
स्वतःच अस्तित्वसुध्दा हरवून"

(पृ.क84 , हे समुद्रा, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

स्त्री म्हणून तिचे असलेले अस्तित्व पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे हरवले आहे. स्त्री असल्यामुळे आपण पिचले जात आहोत याचे भान तिला झाले आहे. हे ती प्रतिमाच्या उपयोजनातून व्यक्त करते. धर्म, जात, परंपरा यांच्याही पलिकडे स्त्री असल्यामुळे तिचे शोषण होते. स्त्रीवर अन्याय होतो, तिचे शोषण होते याचे मुख्य कारण तिचे स्त्रीत्व आहे. सारिका उबाळे परळकर लिहितात–

"जान्हवं कुसात बदलली
किंवा कुस जान्हवांत आला?
सगळीच लिंगं अखंड राहिली"

(पृ.क 57, सकाळ, शिरःस्ताना)

लिंग हे स्त्रीच्या वेदनेचे मुख्य कारण आहे ही जाणीव व्यक्त झाली आहे. प्रथा, परंपरा या कारणाचा शोध ती घेताना दिसते. स्त्री असणे हेच तिच्या वेदनेच कारण आहे.

**२. शोषणाबदलचे भान**

पुरूषप्रधानव्यवस्था स्त्रीचे पूर्णपणे षोषण करते. या षोषणाची विविध रूपेआहेत याची जाणीव तिला होताना दिसते.मात्र ती मूग गिळून गप्प बसते.खरं तर व्यक्त होण्याचा अधिकार तिला व्यवस्थेने दिला नाही. तिचे पूर्ण आयुष्य

भरडले जाते किंवा हे जीवन भरडण्यासाठीच आहे हे तिला जाणिवपूर्वक सांगितले जाते. हे सांगताना सारिका उबाळे परळकर म्हणतात–

" कीस बाई

काया कीस

घराचा दिवस नवऱ्याची रात्र

ओल्या पापण्यामधील घुसमट कीस "

(पृ.क्र 17,कीस बाई कीस, शिरःस्ताना)

तिचं हे आयुष्य तीच्या आपल्या वाटणाऱ्या माणसांकडून भरडले जाते. शोषण करुन घेणे आपली जणू परंपरा आहे असे तिला वाटते. बालिका ज्ञानदेव लिहितात–

" काही एक चूक नसताना

बापानंढोरासारखं झोडलं

आईला बघत

हुदका आवरून

ती गप्प झाली "

(पृ.क्र 86, परंपरा, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

काही जणी मात्र सलमाबिलमा आन्टीचे फटके खाऊन आपल्या शरीराचा सौदा करतात. शारीरिक आणि मानसिक पातळीवर स्त्रीचे होणारे शोषण नेमकेपणाने व्यक्त होते.

**३. समाजव्यवस्थेकडून मिळणारा नकार**

समाज व्यवस्था आपले अस्तित्व, आपले स्त्रीत्व नाकारते याचे भान तिला होताना दिसते. काळ, वेळ, धर्म याच्याही पलीकडे स्त्री असल्यामुळे तिच्या अस्तित्वाबरोबरच तिचे स्वातंत्र, तिचे अधिकार तिच्यापासून हिसकावून घेण्यात आले आहेत. अनादी काळापासून हे सुरू आहे. संस्कृती, धर्म,परंपरा, उपनिषदयांनी नाकारलेले तिचे अस्तित्व शर्मिष्ठा भोसले मांडतात

" चारही वेदांनी नाकारल्या

तुझ्या अस्तित्वाच्या ऋचा

सांगत नाही कुठलाच धर्मग्रंथ

..तुझ्या सोसण्याचा अध्याय "

(बयोBy Sharmishtha Bhosale, Monday, January, 19, 2015)

आजच्या काळात स्त्री अस्तित्वात येण्याअगोदरच तिला नष्ट करण्यात येतं. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून स्त्रीला गर्भातच मारण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. त्याचे अवशेष सारीका उबाळे परळकर यांच्या कवितेत सापडतात.

" एक असतं इजेक्शन

फक्त कळयानाच

निवडून काढणार "

(पृ.क 65, निष्णात, शिरःस्ताना)

याच कारण बालिका ज्ञानदेव सागतात–

"नको असते माझी ओळख

आसपासचं माझं अस्तित्व "

(पृ.क 97, स्वतःला दोष देत, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

आपण या व्यवस्थेला नको आहोत, आपलं अस्तित्व, आपली ओळख, आपल्या भावना, आपले अधिकार नाकारले जातं आहोत याची जाणीव त्यांना आत्मभानातून होऊ लागली आहे.

**४. नववसाहतवादातून होणारे शोषण**

पुरूषप्रधान संस्कृती स्त्रीकडे फक्त उपभोगाची वस्तू म्हणून पाहताना दिसते. व्यवस्था अशा प्रकारे कार्यरत आहे, जिथे स्त्रीच्या नकळत तिच्या शरीराचा बाजार मांडला जातो आणि सौदाही केला जातो. या गोष्टीची जाणीव स्त्रीला अलीकडे होताना दिसते. लग्न ही संस्थासुध्दा याच बाजारीकरणाचा भाग आहे असे म्हटल्यास काही वावगे ठरू नये. स्त्री ही लग्नाच्या बाजारातील 'शोपीस' असते. लग्न या संस्थेविषयी बालिका ज्ञानदेव लिहितात–

" हा तर बाजार आहे

जिथ मुलगी असते एक वस्तू

आणि बाकी सारे सौदागर "

(पृ.क 105, बायकांचे खटीक, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

शरीराचा सौदा होतो, पण तिथ तिची कथा संपत नाही. स्त्री नावाची वस्तू मनसोक्तपणे वापरली जाते. शिकार म्हणून गरजेनुसार, चवीनुसार शरीर चाखलं जातं, ओरबडलं जातं. कधी कधी हा सौदा आपल्या मर्जीनुसार संपविला ही जातो. सरिका उबाळे परळकर हे वास्तव नेमकेपणाने व्यक्त करतात.

" कुर्बान व्हावे लागते

केव्हाही

तलाक तलाक तलाक

ऐकण्यासाठी "

(पृ.क 34, तलाक, शिरःस्ताना)

स्त्री म्हणजे माणूस आहे, हे विसरून तिला पूर्णपणे वस्तूरूप दिलेले आहे. आवश्यकतेनुसार तिचा वापर केला जातो. डिजीटल युगातील स्त्रीच्या होणाऱ्या बाजारीकरणचं सत्य व्यक्त करताना शर्मिष्ठा भोसले लिहितात–

" कशासोबत खपवली जाते बाई

किंवा असं की बाईसोबत खपतं काहीही "

(बाईआणि एमआरपी वगैरे, By Sharmishtha Bhosale, Tuesday, July 30, 2013 )

जसा काळ बदलतो त्याप्रमाणे स्त्रीच्या बाजारीकरणाचं स्वरूपही बदलताना दिसते. मग कोणताही काळ किंवा धर्म असेना स्त्रीचा बाजार मांडला जातो. हे वास्तव अधोरेखित केले आहे. ही जाणीव व्यक्त केली आहे.

### ५. दुय्यमत्वाची जाणीव

स्त्रीला वस्तूरूप देऊन समाजात असलेले तिचे प्रतिष्ठेचे स्थान नाकारण्यात आले. समाजात तिला दुय्यम स्थान दिले. या दुय्यमत्वाची जाणीव तिला प्रकर्षाने होऊ लागली.ही जाणीव कवितेच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. आपले स्थान नाकारले जात आहे याची जाणीवपूर्वक मांडणी सरिका उबाळे परळकर यानी केली आहे. स्त्रीला केला जाणारा हा उपदेश आहे.

" कर्त्याची सत्ता जप गं सूनबाई....

...परक्याचा आत्मा सुखव गं सूनबाई...

...स्वाभिमानाला चिरड गं सूनबाई...

...भावनेला मूठमाती दे गं सूनबाई... "

(पृ.क 16, कारल्याचा वेळ, शिरःस्ताना)

असं जेव्हा सूनेला सांगितलं जातं त्यावेळी तू दुय्यम आहेस आणि सर्वाची मालकी सहन कर. हे तिला सांगितलं जातं. स्त्रीला दुय्यम ठरवत असताना, तिचं अस्तित्व पुरूषांवर अंवलंबून आहे हा पुरूषप्रधान व्यवस्थेचा असलेला गैरसमज आणि आपल्यावर लादलेल्या दुय्यमत्वाची जाणिव कवितेतून व्यक्त केली आहे.

21 व्या शतकातही स्त्रीवर हे दुय्यमत्व लादलं जातं. ती शिक्षित असली किंवा प्रत्येक गोष्ट तिला अवगत असली तरीही तिला दुय्यम ठरविल्यामुळे तिची कुवत असूनही व्यक्त करण्याचा अधिकार नाकारला जातो. हे वास्तव व्यक्त करताना बालिका ज्ञानदेव लिहितात-

" तिनं नसतं मांडायचं

तिचं शिक्षण तिची कुवत

तिची बौध्दिक पातळी "

(पृ.क 103, वयात आलेल्या मुलीला, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

स्त्रीचं दुय्यमत्व यात प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. खरं तर स्त्रीला तिच्या दुय्यत्वाची जाणीव करून दिली जाते याचे भान स्त्रीला होऊ लागले.2010नंतर अधिक प्रखरपणे कवितेच्या माध्यमातून तिने व्यक्त करावयास सुरूवात केली.

### 6. नवसर्जनाविषयीची जाणीव

स्त्रीला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची आणि शोषणाची जाणीव झाली. याचा प्रतिबंध करायला हवा, प्रतिकार करणे गरजे आहे. यांची जाणीव त्यांना झाली. त्यांनी नवनिर्माणासाठी विद्रोह केला .आपल्याकडे असणाऱ्या शक्तीची जाणीव तिला झाली. योजना यादव लिहितात

" थोडया अवधीची भीक

मीही मागत नाही "

(काहीच नाही... By Yojana Yadav, December, 21, 2011½

भीक न मागता त्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द जाब विचारणे गरजेचे वाटते अन्यथा त्या अन्यायाचे स्वरूप अधिकाधिक वाढत राहणार. पण तिचा हा आवाज व्यवस्थेला सहन होणार नाही, याचे ही भान त्यांना आहे. बालिका ज्ञानदेव लिहितात–

" मला माहितय माझा आवाज
पचणार नाही त्यांना
असे कितीतरी आवाज
दाबून ठेवलेत त्यांनी, त्यांच्या व्यवस्थेने "

(पृ.क 106, कोणीतरी गोळा होऊन, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

असे असले तरीही हा खेळ थांबविण्यासाठी आपली सर्व शक्ती गोळा करून उठावेच लागेल अशी चेतावणी त्या इतरांना देतात.शोषण, अन्यायाची जाणीव झाल्यानतंर संघटित होऊन या सर्वाविरूध्द आवाज उठविणे गरजेचे आहे याचीही जाणीव त्यांना झाली आहे. नकार आणि विद्रोहाच्या माध्यमातून त्यांनी प्रतिकार केला आहे. हा प्रतिकार करत असतानाबालिका ज्ञानदेवप्रश्न विचारतात

" बायानो, अजून किती पिढया
जेपासणार आहोत आपण
ही मौनाची परंपरा? "

(पृ.क 86, परंपरा, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

आणि पुढे विद्रोह करायला सांगताना म्हणतात–

" प्रत्येकीनं नागीण होऊन
डसायलाच हवं
म्हणजे शुध्दीवर येतील
बिनडोक साले "

(पृ.क 90,बिनडोक साले, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

हे व्यक्त करताना त्यांच्या मनात आशावाद डोकावितो. बालिका ज्ञानदेव म्हणतात

" मी करू शकणार आहे का
लिंगातर साऱ्या जणींचं "

(पृ.क 118,बाबा तुम्हीच सांगा?, मॅगझिनीतून सुटतेय गोळी)

एक नविन विश्व निर्माण करण्याच भान तिला आहे. त्या दिशेने ती वाटचाल करताना दिसते. आत्मशोध घेताना त्या सर्जनशिल विद्रोह करतात.

**निष्कर्ष**

2010नंतरच्या स्त्रीवादी कवितेतील आत्मभान विविध आशयसूत्रांच्या साहाय्याने स्पष्ट केलेले आहे. हे आत्मभान 2010नंतरच्या समकालीत पर्यावरणवर भाष्य करते.आत्मभानाच स्त्रीची वेदना, शोषण मांडते. या अनुषगाने स्त्रीला आलेले आत्मभान पुढील निष्कर्षाच्या साहाय्याने अधोरेखित करता येईल.

1. आपण केवळ स्त्री असल्यामुळे आपल्यावर अन्याय होतो याचे भान 2010नंतरच्या स्त्रीवादी कवितेतून कवियत्री मांडतात.
2. पुरूष, जात, धर्म, नववसाहतवादी व्यवस्था आपले शोषण करते याची जाणीव या आत्मभानतून होते.
3. हे आत्मभान केवळ वैयक्तिक पातळीवरचे नसून ते संपूर्ण स्त्री जातीचे आहे.
4. या आत्मभानतून समग्र परिवर्तनाचा विचार 2010 नंतरच्या स्त्रीवादी कवियित्री मांडतात.
5. स्त्रीच्या बाबतीत होणरे परिवर्तन, बदल केवळ क्रांतीनेच साकारतील अशी त्यांची धारणा आहे.
6. स्त्रीला आलेल्या आत्मभानतून त्या क्रांतीसाठी सज्ज होतात. नव्या समाजनिर्मिती भाषा करतात.

## संदर्भ सूची

1 ज्ञानदेव बालिका, मॅगझिनीतून सुटतेय गोळी, लोकवाङमय गृह, प्र आ, सप्टेंबर, २०१४.

2 उबाळे परळकर सरिका,शिरःस्ताना, काव्यग्रह प्रकाशन, प्र. आ. जून २०१६.

3 www.facebook.com, sharmishtha Bhosale.

4 www.facebook.com, Yojana Yadav.